गिल-राहुल जोडीवर भिस्त

पहिल्या डावात इंग्लंडची त्रिशतकी आघाडी; स्टोक्सचे शतक

वृत्तसंस्था, मँचेस्टर



कर्णधार बेन स्टोक्सच्या अप्रतिम शतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडने चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या डावात तब्बल ३११ धावांची आघाडी मिळवली. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताने ख्रिस वोक्सच्या पहिल्याच षटकात यशस्वी जैस्वाल आणि साई सुदर्शन यांना सलग दोन चेंडूंवर गमावले. मात्र, कर्णधार शुभमन गिल (नाबाद ५२) आणि केएल राहुल (नाबाद ३०) यांनी किल्ला लढवल्याने भारताने सामना अनिर्णित राखण्याच्या आशा राखल्या आहेत. चौथ्या दिवशी चहापानाला भारताची २९ षटकांत २ बाद ८६ अशी धावसंख्या होती. भारतीय संघ २२५ धावांची मागे होता.

भारताच्या पहिल्या डावातील ३५८ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडने ६६९ धावांची मजल मारली. स्टोक्सने १९८ चेंडूंचा सामना करताना ११ चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने १४१ धावा केल्या. त्याला ब्रायडन कार्स (४७) याची उत्तम साथ लाभली. त्यामुळेच इंग्लंडला पहिल्या डावात त्रिशतकी आघाडी मिळवता आली. इंग्लंडने केवळ एकदाच फलंदाजी करण्याच्या योजनेसह खेळ केला. स्टोक्सने पहिल्या डावात पाच बळी मिळवल्यानंतर फलंदाजीतही चमक दाखवली.

चौथ्या दिवशी उपाहाराला साधारण २० मिनिटे शिल्लक असताना भारताला दुसऱ्या डावात फलंदाजीला यावे लागले. भारताची फलंदाजी सुरू झाली, त्यावेळी ढगाळ वातावरण होते. त्यामुळे चेंडू चांगला स्विंगही झाला. याचा वोक्सने पुरेपूर फायदा घेतला. डावातील पहिल्याच षटकात वोक्सने अप्रतिम आऊटस्विंग चेंडू टाकत जैस्वालला बाद केले. पुढच्याच चेंडूवर साई सुदर्शन माघारी परतला. बाहेर जाणारा चेंडू सोडण्याचा त्याचा प्रयत्न फसला. चेंडू त्याच्या बॅटची कड घेऊन दुसऱ्या स्लीपमधील हॅरी ब्रूककडे गेला. भारताने खातेही न उघडताच दोन फलंदाज गमावले. त्यामुळे अनुभवी राहुल आणि कर्णधार गिल दडपणाखाली होते.

राहुलला खेळपट्टीवर स्थिरावणे फारसे अवघड गेले नाही. गिल मात्र सुरुवातीला अडचणीत सापडताना दिसला. मात्र, बचावात्मक पवित्रा अवलंबण्यापेक्षा त्याने आक्रमक शैलीत खेळत इंग्लिश गोलंदाजांना प्रत्युत्तर दिले. गिल एकवेळ ४२ चेंडूंत ३९ धावांवर होता. त्यानंतर त्याने संयम राखून फलंदाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याचे अर्धशतक ८३व्या चेंडूवर पूर्ण झाले.

२ डावाच्या पहिल्याच षटकात भारताने दोन गडी गमाविण्याची दुसरी वेळ. यापूर्वी न्यूझीलंडविरुद्ध २०१४ मध्ये ऑकलंडमध्ये अशी नामुष्की.

५ इंग्लंडची (६६९) कसोटी क्रिकेटमध्ये पाचवी सर्वोच्च धावसंख्या. सर्वाधिक ७ बाद ९०३ धावा ऑस्ट्रेलियाविरुद्ध १९३८ मध्ये ओव्हल कसोटीत.

१ बुमराने कसोटी कारकीर्दीत प्रथमच डावात १०० हून अधिक धावा खर्ची केल्या. इंग्लंडच्या पहिल्या डावात बुमराचे ११२ धावांच्या मोबदल्यात दोन बळी.



५ एका डावात शतक आणि पाच बळी मिळविणारा स्टोक्स पाचवा कर्णधार. यापूर्वी इम्रान खान (वि. भारत, फैसलाबाद १९८३), मुश्ताक मोहम्मद (वि. वेस्ट इंडिज, पोर्ट ऑफ स्पेन, १९७७), गॅरी सोबर्स (वि. इंग्लंड, लीड्स, १९६६), डेनिस अॅटकिन्सन (वि. ऑस्ट्रेलिया, ब्रिजटाऊन, १९५५).

विद्यापीठ स्पर्धेत साताऱ्याच्या साहिल जाधवला सुवर्ण

महिलांत परणीत कौरची दुहेरी पदककमाई

वृत्तसंस्था, राइन-रुहर (जर्मनी)



साताऱ्याच्या साहिल जाधवने पदार्पणातील जागतिक विद्यापीठ स्पर्धेत तिरंदाजीच्या कम्पाऊंड वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले. त्याच बरोबर परणीत कौरने दुहेरी पदककमाई केली. तिने कुशल दलालच्या साथीत सांघिक सुवर्णपदक मिळवले. वैयक्तिक प्रकारात तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत भारताची दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्य अशी एकूण सात पदके झाली असून, यातील पाच पदके कम्पाऊंड तिरंदाजांनी मिळवली आहेत. उपांत्य फेरीत आपलाच संघ सहकारी कुशल दलालवर चुरशीच्या लढतीत टायब्रेकमध्ये विजय मिळविल्यावर साहिलने अंतिम लढतीत ब्रिटनच्या अजय स्कॉट याचा १४८-१४९ असा पराभव केला. साहिल साताऱ्यातील करंडी गावचा रहिवासी असून, तो दृष्टी अकादमी येथे प्रवीण सावंत यांच्याकडे मार्गदर्शन घेत आहे. तो साताऱ्यातील वाय. सी. महाविद्यालयात एम. एस. सी करत आहे. या स्पर्धेतील साहिलचे हे दुसरे पदक आहे. यापूर्वी भारताच्या सांघिक कांस्यपदक मिळविणाऱ्या संघातही त्याचा समावेश होता.

तिरंदाजीत कम्पाऊंड प्रकारात परणीत कौर आणि कुशल दलाल यांनी मिश्र दुहेरीत कोरियाच्या पार्क येरिन आणि सेउनघ्युन पार्क जोडीचा १५७-१५४ असा पराभव करुन सुवर्णपदक मिळवले. त्यानंतर महिलांच्या वैयक्तिक प्रकारात सुवर्ण लढतीत कोरियाच्या मून येऊन हिच्याकडून परणीत १४७-१४६ असा पराभव पत्करावा लागला.

दरम्यान, अॅथलेटिक्स क्रीडा प्रकारात भारतीय खेळाडूंनी वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. मात्र, दहापैकी एकही धावपटू विजयमंचावर पोहचू शकला नाही.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ईशान्य भारतात

शिलॉन्ग : क्रीडा मंत्रालयाने आगामी ३९व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी वेगळाच निर्णय घेताना ईशान्य भारतामधील आठही राज्यांना सहयजमानपद देण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

मंत्रालयातील एका वरिष्ठ सूत्राने ही माहिती दिली असून, शनिवारी शिलॉन्ग येथे झालेल्या क्रीडामंत्री, क्रीडा सचिव आणि राज्य ऑलिम्पिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत या प्रस्तावाला एकमताने पाठिंबा मिळाल्याचीही माहिती या अधिकाऱ्याने दिली.

मेघालयाचे क्रीडामंत्री शकलियार वारजरी यांच्या अध्यक्षतेखाली आणि अरुणाचल प्रदेशाचे क्रीडामंत्री केंटो जिनी यांच्या सह-अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यापूर्वी १९९९ मध्ये मणिपूर आणि २००७ मध्ये आसाम येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या आहेत. या वेळी अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मिझोराम, मेघालय, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा येथील प्रतिनिधींनी एकत्रित यजमानपदाची सूचना क्रीडा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाने मांडली.

आशिया चषक स्पर्धेसाठी भारत-पाकिस्तान एकाच गटात

स्पर्धा ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिरातीत

वृत्तसंस्था, कराची

पुरुषांची आशिया चषक क्रिकेट स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत संयुक्त अरब अमिराती येथे रंगणार असल्याची घोषणा आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी शनिवारी केली. भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांना एकाच गटात स्थान देण्यात आले असून उभय संघांतील साखळी सामना १४ सप्टेंबरला (रविवारी) दुबई येथे होणार आहे.

आशिया चषक स्पर्धा यंदा ट्वेन्टी-२० प्रारूपात होणार असल्याचे असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाचेही अध्यक्ष असलेल्या नक्वी यांनी 'एक्स'वरुन सांगितले. या स्पर्धेच्या आयोजनाचे हक्क भारताकडे आहेत. मात्र, भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील तणावपूर्ण परिस्थितीमुळे ही स्पर्धा त्रयस्थ ठिकाणी घेण्याचा निर्णय 'एसीसी'च्या २४ जुलैला झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता.

प्रसारणकर्त्यांशी झालेल्या करारानुसार, भारत आणि पाकिस्तान हे संघ एकाच गटात असतील. त्यांच्यासह संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यांना 'अ' गटात, तर श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांना 'ब' गटात स्थान देण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान हे संघ 'अव्वल चार' गटातही आमनेसामने येण्याची शक्यता आहे. हा सामना २१ सप्टेंबरला होऊ शकेल. हा अडथळाही पार करून दोन्ही संघांनी अंतिम फेरी गाठल्यास एकाच स्पर्धेत तीन वेळा हे पारंपरिक प्रतिस्पर्धी एकमेकांविरुद्ध खेळतील.

भारताचे साखळी सामने

- वि. संयुक्त अरब अमिराती (१० सप्टेंबर)
- वि. पाकिस्तान (१४ सप्टेंबर)
- वि. ओमान (१९ सप्टेंबर)

शावी, गॉर्डिओला यांच्या नावाने बनावटी अर्ज!

नवी दिल्ली : भारतीय फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदासाठी शावी हर्नांडेझ आणि पेप गॉर्डिओला यांनी अर्ज केल्याचे वृत्त अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) चोवीस तासांनी फेटाळले आहे. या दोघांच्या नावाने आलेले 'ई-मेल' हे बनावटी होते, असा खुलासा 'एआयएफएफ'ने केला आहे.

'एआयएफएफ'च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानेच शावीने अर्ज केल्याची माहिती शुक्रवारी दिली होती. मात्र, आर्थिक अडथळ्यांमुळे शावीचा अर्ज फेटाळण्यात आल्याचेही त्याने सांगितले होते. या संदर्भात 'एआयएफएफ'ने चोवीस तासांनंतर खुलासा केला.

सात्विक-चिराग जोडीसह भारताचेही आव्हान संपुष्टात

चांगझो : सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीस शनिवारी उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. यामुळे चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील (सुपर १००० दर्जा) भारताचे आव्हान संपुष्टात आले.

मलेशियाच्या द्वितीय मानांकित आरोन शिया आणि सोह वूई यिक जोडीने भारतीय जोडीचा २१-१३, २१-१७ असा पराभव केला. भारतीय जोडीला पुन्हा एकदा मलेशियन जोडीचे आव्हान पार करता आले नाही. आतापर्यंत या दोन जोड्यांत झालेल्या १४ लढतींत मलेशियन जोडीच अधिक यशस्वी ठरली आहे. टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतही मलेशियन जोडीने भारतीय जोडीचे आव्हान संपुष्टात आणले होते.

सात्विक-चिराग जोडीला या स्पर्धेत अपयश आले असले, तरी या वर्षी त्यांनी भारतीय, सिंगापूर आणि मलेशिया खुल्या अशा तीन स्पर्धेत उपांत्य फेरीत धडक मारली होती.

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय - अहिल्यानगर
प्लॉट नं. ३,४,८ व ९, पहिला मजला, नागापूर पुलाजवळ, नगर-मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर - ४१४१११

ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

तमाम जनता तसेच कर्जदार आणि जामिनदार यांना कळविण्यात येते की, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केलेली **युनियन बँक ऑफ इंडिया** यांच्याकडे तारण असलेल्या मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ नुसार **ताब्यात घेतलेल्या मालमत्तेची** खाली नमूद केलेली येणे बाकी त्यावरील भविष्यातील व्याज व इतर खर्च याची वसुली करण्यासाठी ई-ऑक्शन पद्धतीने मालमत्तेची विक्री करण्याचे ठरवले आहे. सदर मालमत्ता बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी '**जशी व जेथे आहे**' आणि '**जे काही आहे**' आणि '**आमच्यावर विना अवलंबित**' तत्त्वावर कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानीशिवाय विक्री (ई-ऑक्शन) करण्याचे ठरवले आहे. खाली दिलेल्या मालमत्तेचा ऑनलाईन ई-ऑक्शनद्वारे ऑनलाईन पद्धतीने https://baanknet.com या वेबसाईटद्वारे खाली नमूद केलेली थकबाकी त्यासोबत त्यावरील व्याज व इतर खर्च वसुलीसाठी दिनांक २९-०८-२०२५ रोजी जाहीर लिलाव केला जाणार आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत आणि बयाणा रक्कम	व्याजासहीत थकबाकी	बयाणा रक्कम भरणेसाठी खाते क्र./ IFSC/शाखा	बोलीची वाढीव रक्कम रु.	ताब्यातील प्रकार
१	मे. वर्धमान ट्रेडिंग कंपनी प्रोप्रा. स्व. श्री. निलेश शांतीलाल पापडीवाल (कर्जदार) द्वारा त्यांचे कायदेशीर वारस - १. श्रीमती सुचिता निलेश पापडीवाल, २. श्री. हर्ष निलेश पापडीवाल, ३. श्री. ओम निलेश पापडीवाल.	जमीन- मालमत्ता सी एस नं.५२/२अ (प), सिटीएस नं.२००२ (प), नवीन गट नं. ४९/१ ते २/२४७, फायनल प्लॉट नं. ३४/९, टीपीएस नं. IV क्षेत्र २०० स्के.मी. एच ००.०२ आर म्युनिसिपल हाऊस नं. ७२९२, नवीन म्युनिसिपल हाऊस नं. डब्ल्यू ०९०००९२८, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.अहमदनगर महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे चतु:सिमा: पूर्व: श्री. पोकळघाट भास्कर यांची मालमत्ता, दक्षिण: रस्ता, पश्चिम: श्री. बाफना रवींद्र फत्तेचंद यांची मालमत्ता, उत्तर: रस्ता.	राखीव किंमत रु. ४८,६२,०००/- बयाणा रक्कम रु. ४,८६,२००/-	रु. १२,६२,३९७.००/- (रुपये बारा लाख बासष्ट हजार तीनशे सत्याण्णव मात्र) दि. २४.११.२०२४ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	508901980050000 of Union Bank of India, Shrirampur Branch, IFSC code UBIN0550892	५००००/-	प्रतिकात्मक
	स्व. श्री. शांतीलाल गंगाराम पापडीवाल (जामिनदार/गहाणदार) द्वारा कायदेशीर वारस - १. श्री. वर्धमान शांतीलाल पापडीवाल, २. श्री. मनोज शांतीलाल पापडीवाल, ३. श्री. जितेंद्र शांतीलाल पापडीवाल. श्री. मनोज शांतीलाल पापडीवाल (जामिनदार व कायदेशीर वारस- शांतीलाल जी. पापडीवाल)						

ई-लिलावाच्या अटी व शर्ती १) लिलाव / बोली ही फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे वेबसाईट https://baanknet.com द्वारे होईल की जे ई लिलावाच्या संपूर्ण प्रक्रीयेची व्यवस्था व समन्वय ई लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करतील. २) ही विक्री सिक्यूरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व २०१६ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदींनुसार काटेकोरपणे होईल. ३) लिलाव दि. २९/०८/२०२५ दु. १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत दर दहा मिनीटांच्या अमर्याद बोली विस्ताराने होईल. म्हणजेच ई लिलावाची बोली मुदत ही प्रत्येक बोली बोलल्यानंतर आपोआप दर १० मिनीटांनी वाढेल. ४) परिक्षणासाठी संपर्क तपशील - इच्छुक निवीदाकार मालमत्तेच्या परिक्षणासाठी व लिलावासंदर्भात अधिक माहितीसाठी शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधू शकतात. ५) वर नमूद मालमत्तांवरील बोजा बँक / शाखेला माहीत नाही. निवीदाकारांना सल्ला देण्यात येतो की, ई लिलावात भाग घेणे व त्यांची निविदा सादर करण्यापूर्वी ई लिलाव विक्रीच्या अटी, शर्ती व अन्य तपशीलासाठी बँकेची वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/auction-property/view-auction-property.aspx and www.unionbankofindia.co.in ला भेट द्यावी.

येणे थकबाकी संपूर्णपणे परतफेड न झाल्यास तसेच नमुद तारखेला ई लिलाव विक्री रोखण्यासाठी सिक्यूरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ चे कलम ८ (६) अन्वये ही कर्जदार व जामीनदार यांना नोटीस समजण्यात येईल.

अहमदनगर
दि. २५/०७/२०२५
(हे मराठी भाषांतर असून, मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य.)
सही/-
अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

ताबा सूचना

एडेलवाईज अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
CIN : U67100MH2007PLC174759
रिटेल केंद्रीय व नोंद. कार्यालय : एडेलवाईज हाउस, सीएसटी मार्गाच्या पलीकडे, कलिना, मुंबई - 400098.

परिशिष्ट IV [नियम-8 (1)] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, सुरक्षित धनकोच्या खाली नमूद प्राधिकृत अधिकारयांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (अॅक्ट) 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील (नियम 3) सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद केल्यानुसार एक मागणी सूचना जारी केली ज्यात कर्जदारांना सदर सूचनेत नमूद रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्यानंतर, येथे नमूद अभिहस्तांकनकर्त्याने स्वतः / खाली नमूद ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून सदर वित्तीय मत्ता **एडेलवाईज अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेड** (यापुढे "ईएआरसी" म्हणून संदर्भित) यांना अभिहस्तांकित केल्या. सर्फेसी अधिनियम, 2002 मधील अनु. 5 अंतर्गत सदर अभिहस्तांकन करारान्वये **ईएआरसी** यांनी अभिहस्तांकन कर्त्याची जागा घेतलेली असून कर्जदाराने प्राप्त केलेल्या वित्त साहाय्याच्या संदर्भातील अंतर्निहित सुरक्षा हिते, जामीने, प्रतिज्ञापत्रे इ. सह अभिहस्तांकनकर्त्याचे सर्व अधिकार, मालकी हक्क व हिते आता त्यांना प्राप्त झालेली आहेत आणी सुरक्षित धनको म्हणून **ईएआरसी** हे आपले सर्व हक्क बजावत आहेत.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा न केल्याने याद्वारे कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की **एडेलवाईज अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा प्रत्येक मालमत्तेसमोर नमूद करण्यात आलेल्या दिनांकास ताबा घेतलेला आहे.

अ. क्र.	अभिहस्तांकनकर्त्याचे नाव	ट्रस्टचे नाव	कर्ज खाते क्रमांक	कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव	मागणी सूचनेची दिनांक व रक्कम	ताबा दिनांक	ताब्याची स्थिती
1	आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड	ईएआरसी ट्रस्ट एससी - 448	NHSHI000 00832300	1) श्री. केवाराम लखाराम चौधरी (कर्जदार आणि गहाणदार), 2) कु. चंपा केवाराम चौधरी (सह-कर्जदार)	23-04-2024 आणि रु. 36,11,689.23 पै.	22-07-2025	प्रत्यक्ष ताबा
मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 13, साई विश्व, मजला क्र. 1, अंतिम प्लॉट क्र 5 भाग उप प्लॉट क्र 31 टीपीएस क्र 3 गट क्र 127 भाग शिरसगाव, श्रीरामपूर, अहमदनगर राज्य : महाराष्ट्र पिनकोड : 413709 येथे स्थित.							
2	आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड	ईएआरसी ट्रस्ट एससी - 448	NHSHI000 01266503	1) श्री. लालजीत राजदेव यादव (कर्जदार) 2) सौ. मंजुदेवी लालजीत यादव (सह-कर्जदार)	12-03-2023 आणि रु. 18,36,121.58/-	23-07-2025	प्रत्यक्ष ताबा
मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. जी -3, पहिला मजला, विंग सी, स्वप्न नगरी, कॉन्डोमिनियम बिल्डिंग प्लॉट क्र. 42 ते 57, स. क्र. 6(भाग), स क्र. 78/2बी ते 78/2ए/2, पाणी साठवण टाकी जवळ, वॉर्ड क्र I, भैरवनाथ नगर, श्रीरामपूर, जुना स. क्र. 78 नवीन क्र. 6 हिस्सा क्र. 132 शेअर 1315.50 चौ. फू. च्या मंजूर लेआउटचा, हरिरामपूर, श्रीरामपूर, अहमदनगर, महाराष्ट्र, पिन कोड : 413709, फ्लॅट मोजमाप 39.125 चौ. मी. **चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व** : फ्लॅट क्र. जी -2, **दक्षिण** : फ्लॅट क्र. जी -4, **पश्चिम** : पार्किंग आणि सामायिक जागा, **उत्तर** : फ्लॅट क्र. जी-8.							

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते. याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो एडेलवाईज अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेड च्या खाली नमूद रक्कम व तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : 27.07.2025
स्वा./- प्राधिकृत अधिकारी
एडेलवाईज अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

Edelweiss Asset Reconstruction

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट -IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय : 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स : 011-23357171, 23357172, 23705414, वेब. : www.pnbhousing.com

शाखा अहमदनगर : युनिट क्र - 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्ता मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. [illegible]

[illegible]
NHL/AHMD/0918/582890 ... मेहेर / प्रियांका नीलेश मेहेर, शाखा : अहमदनगर ... आणि 17-02-2020 ... ताबा ... लेन, अदाते बाजार जवळ, दालमंडई, अहमद नगर, महाराष्ट्र - 414001, भारत. ... 10000 ... 12:00 ते दु. 04:00 ... 2 ते दु. 03:00

*सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र. - के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

ठिकाण :- अहमदनगर, दिनांक :- 26.07.2025
स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

AU SMALL FINANCE BANK A SCHEDULED COMMERCIAL BANK

एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (ए शेड्युल्ड कमर्शियल बँक)
नोंद. कार्यालय : 19-ए, धुलेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर -302001 (CIN : L36911RJ1996PLC011381)

परिशिष्ट IV [नियम 8(I) पाहा)] ताबा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (ए शेड्युल्ड कमर्शियल बँक)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [अॅक्ट, 2002 (2002 चा 54)] अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13 (12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद दिनांकास कर्जदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली होती त्यांना सदर सूचनेत नमूद रकमेची सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत खालील तक्त्यामध्ये दिलेल्या तपशीलानुसार परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते :-

कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदाराचे नाव / कर्ज खाते क्र.	13(2) सूचनेचा दिनांक व रक्कम	तारण मालमत्तेचे वर्णन	ताबा घेतल्याचा दिनांक
(कर्ज खाते क्र.) L9001060100027663, शैलेश उत्तम पिंपरकर (कर्जदार), श्रीमती अर्चना शैलेश पिंपरकर (सह-कर्जदार),	13-मार्च-25 रु. 5,15,546/- रु. पाच लाख पंधरा हजार पाचशे शेहेचाळीस फक्त दि. 12-मार्च-25 रोजी नुसार	पुढील रहिवासी / व्यावसायिक मालमत्ता जमीन / इमारत / रचना आणि फिक्स्चर चे सर्व खंड आणि तुकडे, सी.टी.एस- 334, 332, मिळकत क्र- 353, 351 गाव - गुंडेगाव, तेह आणि जिल्हा- अहमदनगर, महाराष्ट्र येथे स्थित असलेली मालमत्ता. **मोजमाप 112.7 चौ. मी.** पूर्वः सीटीएस क्र- 335 आणि 696, पश्चिमः सीटीएस क्र- 333 आणि 329, उत्तरः रस्ता आणि सीटीएस क्र- 333, 334, 335, दक्षिणः सीटीएस क्र- 332 आणि 330, 331.	21-जुलै-25
(कर्ज खाते क्र.) L9001060133916361, माऊली कलेक्शन अँड लेडीज शॉपी, माऊली इलेक्ट्रिकल्स सर्व्हिसेस (कर्जदार), शंकर हुलजुटे (सह-कर्जदार), श्रीमती. मंदाबाई हुलजुटे (सह-कर्जदार) ज्ञानेश्वर शंकर हुलजुटे (सह-कर्जदार)	15-मार्च-25 रु. 11,30,673/- रु. अकरा लाख तीस हजार सहाशे त्र्याहत्तर फक्त दि. 12-मार्च-25 रोजी नुसार	पुढील रहिवासी / व्यावसायिक मालमत्ता जमीन / इमारत / रचना आणि फिक्स्चर चे सर्व खंड आणि तुकडे, सर्व्हे क्र 499-1ए, प्लॉट क्र 57बी, तहसील अहमदनगर, शाउ नगर बस स्टॉप मराठानगर केडगाव, जिल्हा अहमद नगर, महाराष्ट्र येथे स्थित असलेली मालमत्ता. **मोजमाप 143.36 चौ. मी.**	21-जुलै-25

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियम [कायदा 2002] च्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत त्यांना / तिला बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत वर तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेचा वर तक्त्यामध्ये नमूद दिनांकास ताबा घेतलेला आहे. ''उपलब्ध वेळेत, म्हणजेच या सूचनेपासून 30 दिवसांमध्ये सुरक्षित मत्तेच्या विमोजनाकरिता, कर्जदारांचे लक्ष नियम 8(6) सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 मधील उपकलम (8) च्या तरतुदींकडे वेधीत आहोत.'' कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये, असा कोणताही व्यवहार केल्यास तो **एयु स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्युल्ड कमर्शियल बँक)** च्या वर नमूद रक्कम अधिक वर तक्त्यात नमूद व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

दिनांक : 25/07/2025
ठिकाण : पुणे / अहमदनगर
स्वा/-
प्राधिकृत अधिकारी, एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

अॅसेटस् रिकव्हरी शाखाः छत्रपती संभाजीनगर, प्लॉट नं. ०३, पहिला मजला, सहकार बँक कॉलनी, शाहनूरवाडी, दर्गाह रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.
Email Id: arb.aurangabad@unionbankofindia.bank

ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या ई-लिलावासाठी १५ दिवसांची विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह.

तमाम जनता तसेच कर्जदार आणि जामिनदार यांना कळविण्यात येते की, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केलेली **युनियन बँक ऑफ इंडिया** यांच्याकडे तारण असलेल्या मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ नुसार **ताब्यात घेतलेल्या मालमत्तेची** खाली नमूद केलेली येणे बाकी त्यावरील भविष्यातील व्याज व इतर खर्च याची वसुली करण्यासाठी ई-ऑक्शन पद्धतीने मालमत्तेची विक्री करण्याचे ठरवले आहे. सदर मालमत्ता बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी '**जशी व जेथे आहे**' आणि '**जे काही आहे**' आणि '**आमच्यावर विना अवलंबित**' तत्त्वावर कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानीशिवाय विक्री (ई-ऑक्शन) करण्याचे ठरवले आहे. खाली दिलेल्या मालमत्तेचा ऑनलाईन ई-ऑक्शनद्वारे ऑनलाईन पद्धतीने https://baanknet.com या वेबसाईटद्वारे खाली नमूद केलेली थकबाकी त्यासोबत त्यावरील व्याज व इतर खर्च वसुलीसाठी दिनांक १४-०८-२०२५ रोजी जाहीर लिलाव केला जाणार आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव व संपर्क क्रमांक	कर्जदाराचे नाव/ सहकर्जदार/जामिनदार	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत आणि बयाणा रक्कम	व्याजासहीत थकबाकी	बोलीची वाढीव रक्कम	ताब्यातील प्रकार
१	ARB - CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (8698221258)	मे. प्रगती कॉटन ऑईल मिल्स, प्रोप्रा. श्री. मच्छिंद्र राघुजी बोधने (कर्जदार/प्रोप्रायटर) श्रीमती मीरा सोमनाथ लुटे (जामिनदार)	मालमत्ता -ग्रामपंचायत मिळकत नं. १७२, क्षेत्र४४०० स्के.फूट गाव पिंपळस, ता. राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- कॅनॉल रस्ता, पश्चिम-श्री. नवनाथ बोधाने गल्ली, उत्तर- गोरख बोऱ्हाडे यांची मालमत्ता, दक्षिण- रस्ता. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं.१७६, क्षेत्र ४४०० स्के.फूट गाव पिंपळस, ता.राहाता, जि.अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- कॅनॉल रस्ता, पश्चिम:आतील रस्ता, उत्तर: ग्रा.पं. मिळकत नं. १७४, दक्षिण- ग्रा.पं. मिळकत नं. १७२. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १७९, क्षेत्र २००० स्के.फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- श्री. बोधाने यांची जमीन, पश्चिम- श्री. बाळशंकर यांची मालमत्ता, उत्तर-श्री. परदेशी व श्री.नारद यांची मालमत्ता, दक्षिण-श्री.पवार यांची मालमत्ता एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १६७, क्षेत्र ३१२० स्के.फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- श्री. बोधाने यांची जमीन, पश्चिम-गावठाण जमीन, उत्तर- श्री. रघुवंशी यांची मालमत्ता, दक्षिण- श्री. बाळशंकर यांची मालमत्ता. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १७७, १६६ व १७४, क्षेत्र ७६६० स्के.फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- ग्रामपंचायत रस्ता, पश्चिम- गणपत नारद यांची जमीन, उत्तर- मुक्ता बोऱ्हाडे मालमत्ता, दक्षिण- ग्रामपंचायत मिळकत नं. १७४. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १७१, क्षेत्र १६०० स्के.फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व- श्री. बोधाने यांची जमीन, पश्चिम - रस्ता, उत्तर - रस्ता, दक्षिण - नवनाथ बोधाने यांची जमीन. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १७५, क्षेत्र ३२५० स्के. फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र. चतु:सीमा: पूर्व - रस्ता, पश्चिम - श्री. बोधाने यांची मालमत्ता, उत्तर - कॅनॉल, दक्षिण- श्री. बोधाने यांची मालमत्ता. एन ए मालमत्ता - ग्रामपंचायत मिळकत नं. १८०, क्षेत्र ३२५० स्के. फूट गाव पिंपळस, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र, चतु:सीमा: पूर्व- रस्ता, पश्चिम - श्री. बोधाने यांची मालमत्ता, उत्तर - श्री. बोधाने यांची मालमत्ता, दक्षिण - रस्ता.	राखीव किंमत रु. १,३६,७४,०००/- बयाणा रक्कम रु. १३,६७,४००/-	रु. १,३८,७६,९०७/- (एक कोटी अडतीस लाख शहात्तर हजार नऊशे सात रुपये मात्र) दि. १४.१२.२०२१ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	रु. १३७०००	प्रत्यक्ष
२	ARB - CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (9561610798)	विजय छगनराव कुमावत (कर्जदार), मयुरी विजय कुमावत (सहकर्जदार) मिलिंद हिरालाल देहारकर (जामिनदार)	श्री. विजय छगनराव कुमावत यांची मालमत्ता-एनए जमीन सर्व्हे नं. ९/१०३ (भाग), मिळकत नं. १४२४, क्षेत्र १००.०० स्के.मी. दत्तनगर, शिर्डी पिंपळवाडी रोडजवळ स्थित, मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर. चतु:सीमा: पूर्व-आतील रस्ता, पश्चिम- सर्व्हे नं. ९ पैकी, उत्तर- सर्व्हे नं. ०९/१०३ (७/१ए) पैकी, दक्षिण - सर्व्हे नं. ०९/१०३ (७/१ए) पैकी.	राखीव किंमत रु. ८३,५१,०००/- बयाणा रक्कम रु. ८,३५,१००/-	रु. ३७,३०,१५३.७४/- (सदतीस लाख तीस हजार एकशे त्रेपन्न रुपये व चौऱ्याहत्तर पैसे मात्र) दि. ०५.०४.२०२१ पर्यंतचे एकूण येणे + (व्याज व शुल्क) भविष्यातील व्याज व इतर खर्च	८४०००/-	प्रतिकात्मक

ई-लिलावाच्या अटी व शर्ती १) लिलाव / बोली ही फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे वेबसाईट https://baanknet.com द्वारे होईल की जे ई लिलावाच्या संपूर्ण प्रक्रीयेची व्यवस्था व समन्वय ई लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करतील. २) ही विक्री सिक्यूरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व २०१६ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदींनुसार काटेकोरपणे होईल. ३) लिलाव दि. १४/०८/२०२५ दुपारी १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत दर दहा मिनीटांच्या अमर्याद बोली विस्ताराने होईल. म्हणजेच ई लिलावाची बोली मुदत ही प्रत्येक बोली बोलल्यानंतर आपोआप दर १० मिनीटांनी वाढेल. ४) परिक्षणासाठी संपर्क तपशील - इच्छुक निवीदाकार मालमत्तेच्या परिक्षणासाठी व लिलावासंदर्भात अधिक माहितीसाठी शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधू शकतात. ५) वर नमूद मालमत्तांवरील बोजा बँक / शाखेला माहीत नाही. निवीदाकारांना सल्ला देण्यात येतो की, ई लिलावात भाग घेणे व त्यांची निविदा सादर करण्यापूर्वी ई लिलाव विक्रीच्या अटी, शर्ती व अन्य तपशीलासाठी बँकेची वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/auction-property/view-auction-property.aspx and www.unionbankofindia.co.in ला भेट द्यावी.

छत्रपती संभाजीनगर
दि. २४/०७/२०२५
(हे मराठी भाषांतर असून, मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य.)
सही/-
अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई -२५, एम.आय.डी.सी.,वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१ येथे प्रसिद्ध केले. **संपादकीय/ जाहिरात/ वितरण** : १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१. दूरध्वनी- ०२४१-२४५११९०७, २४५१५४४, फॅक्स : ०२४१-२४५१६०७.
लोकसत्ता कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९१००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. MAHMAR/2010/36250 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.